# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## प्रसिध्दीपत्रक

### संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) एप्रिल-2016 निकाल

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत एप्रिल -२०१६ मध्ये घेण्यात आलेल्या पहिल्या संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल शुक्रवार दिनांक २७/०५/२०१६ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आला आहे. ही परीक्षा १७/०४/२०१६ ते २४/०४/२०१६ या कालावधीत राज्यातील एकूण ७८ केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांची मुळ प्रमाणपत्रे / गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्हयांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद व मुंबईसाठी शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, बालभवन, चर्नी रोड, मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधीत टंकलेखन संस्थांना वितरीत करण्यात येतील. विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्रे/गुणपत्रके यथावकाश टंकलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांत परीक्षार्थीने संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रु. १०० व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रु. ४००/-ऑनलाईन चलनाने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत दिनांक १०/०६/२०१६ पर्यंत भरावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

#### निकालाची संक्षिप्त माहिती

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| टंकलेखन मराठी ३०श.प्र.मि / हिंदी ३० श.प्र.मि | ३४६८ | २९२९ | ५३९ | ४४७ | २४७९ | ०३ | १५.२७ % |
| इंग्रजी ३० श.प्र.मि | ५८१९ | ४९५१ | ८६८ | १३४२ | ३५९७ | १२ | २७.३५% |

(बी.डी.फडतरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१